
## तात्या टोपे यांची स्फूर्तिदायक कहाणी




प्रसिद्ध लेखिका स्मिता भागवत यांचे 'पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे' हे अवघ्या ६५ पानांचे छोटेखानी पुस्तक वाचनात आले. 'मातृभूमी सेवा ट्रस्ट'ने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकातून १८५७ च्या युद्धातील सेनानी तात्या टोपे यांचे स्फूर्तिदायक चरित्र उलगडत जाते. विशेष म्हणजे तात्या टोपे हे स्मिता भागवत यांचे मामेपणजोबा. त्या २००७ मध्ये पुण्याला आल्या असताना १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची १५० वी जयंती होती. एका कार्यक्रमात संयोजकांनी श्रीमती भागवत यांना तात्या टोपे यांची 'रक्ताची नातेवाईक' म्हणून बोलण्याची संधी दिली. तेव्हा त्यांच्या मनात 'वैचारिक घुसळण' सुरू झाली आणि त्यातून नंतर हे छोटेसे पण महत्त्वाचे पुस्तक आकाराला आले.

स्मिता भागवत त्यांच्या मनोगतात म्हणतात 'स्वतंत्र भारतातही शहिदांच्या कुटुंबीयांना खूप सोसावे लागले हे कटू सत्य! तात्यांचे वंशज त्यास अपवाद नाहीत. त्यांच्या वडिलांनी संन्यास घेतला होता. तात्यांच्या फाशीनंतर मणकर्णिकेच्या घाटावर ते समाधिस्थ झाले. तात्यांना सखाराम व मनोरमा ही अपत्ये. तात्या काल्पीस असताना मनोरमास पुत्र झाला. पेशव्यांच्या सेवेत सखाराम नेपाळला गेला. त्याच्या वारसदारांचे वास्तव्य बिठूरच्या भव्य वाड्यात होते. तात्यांच्या फाशीनंतर हा वाडा भस्मसात केल्याने, सखारामच्या कुटुंबाचे हाल झाले. तात्यांना आठ भावंडे! पोटासाठी भटकत कुणी येवले, बडोदे वा अजून कुठे विखुरले.

तात्या टोपे यांच्यासारखा पराक्रमी सेनापती हाती लागून त्यांना फाशी देईपर्यंत १८५७ चे युद्ध संपले असे ब्रिटिशांनाही वाटत नव्हते, असे सांगून स्मिता भागवत म्हणतात, 'तात्या फाशी गेल्याने त्यांच्या कुटुंबाचे फार हाल झाले. अन्नान्नदशा, उपासमार, शिक्षणापासून वंचित, मुलीबाळींचे हाल... दुर्दैवाचे दशावतार त्यांनी भोगले. स्वातंत्र्य मिळाल्यावरही त्यात बदल झाला नाही. बिठूरला किराणा मालाच्या दुकानावर जेमतेम गुजराण करणारे तात्यांचे वारस विनायक व सौ. सरस्वती यांना १९९५ साली मासिक पाचशे रुपये पेन्शन देण्याची घोषणा झाली. तो घोषच ठरला. पेन्शन मिळाले नाही. १८१४ ते १८५९ असं अवघं ४५ वर्षांचं जीवन वाट्याला आलेल्या तात्या टोपे यांनी १८५७ च्या युद्धामध्ये इंग्रजांना कसं जेरीस आणलं त्याची कहाणी हे पुस्तक सांगते. तात्यांचे मूळ आडनाव येवलेकर. त्यांचे नाव रघुनाथ किंवा रामचंद्र. कंपनी सरकारने (इंग्रजांनी) १८१८ मध्ये पेशवाई खालसा करून त्यांना उत्तर हिंदुस्थानात ब्रह्मावर्त म्हणजे आजचे बिठूर येथे पाठविले. त्यांच्यासमवेत तात्यांचे वडीलही होते. पेशव्यांना तात्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक होते. त्यांनी तात्यांना नऊ हिरे जडविलेली टोपी दिली होती. म्हणून पुढे त्यांचे आडनाव टोपे असे झाले. (गोडसे भटतींच्या 'माझा प्रवास'मध्ये मात्र तात्यांचा उल्लेख तात्या टोपी असा येतो.)

१८५७ च्या रोमांचकारी लढ्याचे वर्णन भागवत यांच्या पुस्तकात येतेच पण अखेरच्या क्षणी चरित्रनायक तात्या टोपे यांचा जो बाणेदारपणा त्यांनी नोंदला आहे तो काळजाचा ठाव घेणारा आहे, त्या लिहितात.

'तात्यांचे बोलणे शांत स्वरात तरी ठाशीव, निर्भीड व भारदस्त होते. अटक झाल्याक्षणापासून ते बाणेदारपणे स्वत:चा आब राखून निर्भयतेने वावरत होते. त्यांच्या मुद्रेवर कधीही हरलेपण, लाचारी वा खंत-खेद नव्हता.' तात्या फाशी जाताना इंग्रजांसमोर पेशव्यांचे सेनापती या नात्याने गरजले की, 'तुमच्याविरुद्ध मी युद्ध केले ते जाणतेपणी! ते नाकारून खोटे पुरावे देतो तो भ्याड असतो. मी सजेस सिद्ध आहे. मला न्यायालयात नाट्यकर्मीची गरज वाटत नाही.' शृंखलाबद्ध हात वर करून तात्या निर्णायक स्वरात म्हणाले, 'मला तोफेच्या तोंडी देण्याचे ठरवा किंवा फाशीची शिक्षा द्या. मी दयेची भीक मागणार नाही.' आपल्या कृत्याचा आपल्या वृद्ध वडिलांना त्रास होऊ नये एवढीच त्यांची अखेरची इच्छा होती.

१८ एप्रिल १८५९ या दिवशी दुपारी इंग्रजांनी तात्या टोपे यांना फाशी दिली. १८५७ च्या युद्धाला यंदा १५५ वर्षे झाली. त्यातील सेनापतीचे हे चरित्र प्रत्येकाने वाचावे असेच आहे.

- दिलीप जोशी, khagoldilip@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : दैनिक सामना)